महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
**सहाय्यक अभियंता श्रेणी - १**
**जिगांव पुनर्वसन उपविभाग क्र. ३ शेगांव**
**गजानन वाटिका जवळ खामगांव रोड शेगांव जि. बुलढाणा**

जावक क्रमांक :१०५/ तां.शा./सावरगांव/स.ख./२०२५ | **दिनांक** :-१०/३/२०२५

**प्रति,**

**कार्यकारी अभियंता**
प्रशासन संगणकीकरण विभाग
कोथरुड , पुणे ३८

**विषय : - जिगांव प्रकल्प ता. नांदुरा जि. बुलढाणा**
जिगांव प्रकल्पांतर्गत जिगांव उपसा सिंचन योजना क्र. ३ च्या पंपगृह बांधकामाकरिता मौजे. सावरगांव ता. जळगांव जामोद शिवारातील १.०३ हे. आर. खाजगी जमिनीचा सरळ खरेदीचा जाहिरनामा जलसंपदा विभागाच्या पोर्टलवर प्रसिद्ध करणेबाबत.

*****

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने जिगांव प्रकल्प ता. नांदुरा जि. बुलढाणा अंतर्गत जिगांव जिगांव उपसा सिंचन योजना क्र. ३ च्या पंपगृह बांधकामाकरिता मौजे. सावरगांव ता. जळगांव जामोद शिवारातील १.०३ हे. आर. खाजगी जमिनीचा सरळ खरेदीचा जाहिरनामा प्रसिद्धीसाठी सोबत जोडण्यात आला आहे. सदर जाहिरनामा जलसंपदा विभागाच्या पोर्टलवर प्रसिद्ध करण्याची तरतूद करावी, तसेच सदर जाहीरनामा आपल्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाल्याबाबत चा अहवाल या कार्यालयास पत्राद्वारे कळविण्यात यावा ,ही विनंती. प्रसिद्धीसाठी आवश्यक असलेली कार्यालयीन टिप्पणी सोबत जोडण्यात आली आहे.

आपल्या माहिती व पुढील कार्यवाहिसाठी सविनय सादर.

**सहाय्यक अभियंता श्रेणी - १**
जिगांव पुनर्वसन उपविभाग क्र. ३
शेगांव

**सहपत्र** :- १) जाहीरनामा १ प्रतीत
२) कार्यालयीन टिपणी

**प्रतिलिपी** :- कार्यकारी अभियंता जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग शेगांव यांना माहितीकरीता सविनय सादर.

AnyScanner

# जाहिर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत जिगांव प्रकल्प ता. नांदुरा जि. बुलढाणा अंतर्गत जिगांव उपसा सिंचन योजना क्र. ३ च्या पंपगृह बांधकामाकरिता मौजे. सावरगांव ता. जळगांव जामोद शिवारातील खालील वर्णनीत खाजगी शेतजमीन सरळ खरेदी व्यवहाराने संपादन करण्याचे प्रस्तावित असल्याने त्याबाबतचे आक्षेप व हरकती मागविण्याबाबत सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

सोबत प्रसिद्धीस दिलेल्या यादीतील जमीन मालकांना/धारकांना व नमुद केलेल्या शेतजमिनीशी ज्यांचा हितसंबंध आहे, अशा सर्व ज्यामध्ये सर्व बँक, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, वारस व इतर संबंधीत आदींचा समावेश आहे, असे अधिकार अभिलेखावरून दिसते अशा सर्व लोकांनी/व्यक्तींनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात आवश्यक त्या सर्व दस्तऐवजांसह कार्यालयीन वेळेत सहाय्यक अभियंता श्रेणी - १, जिगांव पुनर्वसन उपविभाग क्र. ३, शेगांव गजानन वाटिका जवळ खामगांव रोड शेगांव ता. शेगांव जि. बुलढाणा (दूरध्वनी क्र. ०७२६५-२५४६८८) या पत्त्यावर आक्षेप व हरकती दाखल कराव्यात. ठराविक कालावधीनंतर येणा-या आक्षेप/हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरील जमिनीचा सरळ खरेदी व्यवहार संबंधीतांशी केला जाईल, याची नोंद घ्यावी.

सोबत जमीन मालकांची त्यांचे ७/१२ नुसार गटनिहाय प्रस्तावित खरेदी करावयाच्या क्षेत्रासह माहिती प्रसिद्धीस दिली आहे.

ॲड. राजेश एन गवई
ऑफिस पत्ता
सिव्हील लाईन, मोठ्या विहीरीजवळ,
सप्तश्रृंगी माता मंदिराच्या बाजुला
खामगाव
मोबाईल क्र. ९८५०४२६६३६

(एस.एस.यमाजी)
सहाय्यक अभियंता श्रेणी – १
जिगांव पुनर्वसन उपविभाग क्र.३
शेगांव
मोबाईल क्र. ९४०४६६६८१५

AnyScanner

**जिगांव प्रकल्प ता. नांदुरा जि. बुलढाणा अंतर्गत जिगांव उपसा सिंचन योजना क्र. ३ च्या पंपगृह बांधकामाकरिता मौजे. सावरगांव ता. जळगांव जामोद शिवारातील खाजगी जमिनीचा तपशील**

| अ.क्र | भूधारकाचे नाव | गट क्र. | भू धारण पद्धती | भूसंपादन अभिलेखा प्रमाणे वहिति तील एकूण क्षेत्रफळ (हे. आर) | ७/१२ प्रमाणे भूधारकाचे क्षेत्र (हे. आर) | पोट खराब | खरेदी करावयाचे क्षेत्रफळ (हे. आर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १) | हसन खा इसे खा | २०१ | भो.व. १ | ०.८६ | ०.८६ | ०.०१ | ०.८६ |
| २) | गोविंदा दगडू मंडवाले | २०२ | भो.व. १ | ०.१७ | ०.१७ | ०.०० | ०.१७ |
| | | | | | | एकूण | १.०३ |

(एस.एस. यमाजी )
सहाय्यक अभियंता श्रेणी - १
जिगांव पुनर्वसन उपविभाग क्र.३
शेगांव

AnyScanner

# कार्यालयीन टिप्पणी

क्रमांक :- जा.क्र.                                                                 दिनांक :-   /   /२०२५

**विषय :-** जिगांव प्रकल्पांतर्गत जिगांव उपसा सिंचन योजना क्र. ३ च्या पंपगृह बांधकामाकरिता मौजे. सावरगांव ता. जळगांव जामोद शिवारातील १.०३ हे. आर. खाजगी जमिनीचा सरळ खरेदीचा जाहिरनामा जलसंपदा विभागाच्या पोर्टलवर प्रसिद्ध करणेबाबत.

**अ) अपलोड करण्याबाबत मागणी करणाऱ्या कार्यालयाने भरावयाची माहिती**

| अ.क्र. | विषय | तपशील |
|---|---|---|
| १ | अपलोड करण्यात येणाऱ्या फाईल/ धारीकांचा विषय | जिगांव प्रकल्पांतर्गत जिगांव उपसा सिंचन योजना क्र. ३ च्या पंपगृह बांधकामाकरिता मौजे. सावरगांव ता. जळगांव जामोद शिवारातील १.०३ हे. आर. खाजगी जमिनीचा सरळ खरेदीचा जाहिरनामा जलसंपदा विभागाच्या पोर्टलवर प्रसिद्ध करणेबाबत. |
| २ | अपलोड करण्याबाबत मागणी करण्यात आलेले कार्यालयाचे नाव | कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प धरण व पुनर्वसन विभाग शेगांव |
| ३ | अपलोड करण्याविषयी मागणी करण्यात आलेल्या पत्राचा दिनांक | दि. |
| ४ | माहिती किती कालावधीसाठी अपलोड करावयाची आहे? | १५ दिवस |
| ५ | कारण | सरळ खरेदी करण्यापुर्वी प्रक्रियेप्रमाणे जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर जाहीर सुचना प्रसिध्द करणेबाबत |
| ६ | संकेतस्थळावरती माहिती कोठे अपलोड करावी याचा तपशील. (उदा. - पत्रपेटी, घटना व प्रकटने.......) | |
| ७ | अपलोड करण्यात येणाऱ्या फाईल/ धारिकांची संख्या | १ जाहिर नोटीस - एकुण २ पृष्ठ |

पुरविण्यात आलेल्या माहिती व संकेतस्थळावरती अपलोड करण्यात येणारी कागदपत्रे तपासली असुन ती अचुक असल्याची खात्री करण्यात आली आहे. सदर अपलोड होणाऱ्या कागदपत्रांची संपुर्ण जबाबदारी या कार्यालयाची राहील.

विभाग प्रमुखांची स्वाक्षरी

| ब) प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयाने भरावयाची माहिती | | |
|---|---|---|
| १ | मागणी कशाद्वारे प्राप्त झाली<br>(पत्र/ ई-मेल/ दुरध्वनी) | |
| २ | कोठे अपलोड करण्याचे प्रस्तावित आहे ? | |
| संकेतस्थळ व्यवस्थापक - अपलोडींग<br>सहाय्यक अभियंता श्रेणी - २ | | |
| संकेतस्थळ व्यवस्थापक - प्रमाणीकरण<br>सहाय्यक अभियंता श्रेणी - २ | | |
| संकेतस्थळ व्यवस्थापक - कार्यकारी अभियंता<br>(प्रशासन संगणकीकरण विभाग) | | |
| मंजुरी<br>अधीक्षक अभियंता, ई-प्र.मं., मुंबई | | |

SCAN AnyScanner